# मूल समजून घेण्याची दोन तत्त्वे

'मूले असतात कशी?' 'शिकतात कशी?' ही सुषमा पाध्ये यांची लेखमालिका शिक्षणपत्रिकेतून प्रसिध्द होत आहे. मुले असतात कशी, यावर पियाजे या मानसशास्त्रज्ञाने दोन महत्त्वाची तत्त्वे सांगितली आहेत.

१) सर्व मुले समान असतात. २) प्रत्येक मूल वेगळे असते.

ही दोन तत्त्वे अधिक स्पष्ट करणारा, सुषमा पाध्ये यांच्या मांडणीला अधिक बळकटी देणारा हा लेख.

औषधोपचार करायचा असेल तर डॉक्टर आधी मुलाला तपासतो, त्याच्या आजाराची कारणमीमांसा करतो, आणि मगच योग्य ती उपाययोजना करतो. ही जी आरोग्याच्या क्षेत्रात मान्य पध्दत आहे, तशीच पध्दत शिक्षणाच्या क्षेत्रात असावी लागते. ज्या मुला-मुलीचे शिक्षण आपल्याला करायचे आहे, ते मूल प्रथमतः समजावून घेणे गरजेचे असते. कारण, त्यावरून त्याचे किंवा तिचे शिक्षण कसेकसे करायचे, याचे भान आपल्याला येईल. थोडक्यात असे, की बालकाचे शिक्षण करायचे तर ते करणाऱ्यांना बालक नीट माहित झाले पाहिजे.

आजवरच्या आपल्या शिक्षणव्यवस्थेचा दोष असा आहे की, शिक्षणाच्या सर्व स्तरांवरील, सर्व प्रक्रियांमध्ये मुला-मुलीला, विद्यार्थी-विद्यार्थिनीला गृहीत धरलेले असते. तसेच, विशिष्ट वयाच्या सर्व किंवा शाळेच्या वर्गातील सर्व मुलांची एक सर्वसाध रण पातळी गृहीत धरली जाते. अर्थात 'सर्व मुले सर्व बाबतीत समान आहेत, ही भूमिका त्यामध्ये असते. पण, प्रत्यक्षात तसे नसते.

प्रगत बालमानसशास्त्राने दोन सिध्द बाबी आपल्यासमोर ठेवल्या आहेत. एक म्हणजे, काही बाबतीत सर्व मुले समान असतात; आणि दुसरे म्हणजे, काही बाबतीत प्रत्ये क मूल इतरांपेक्षा वेगळे असते. मुलांचे शिक्षण करू पाहणा-यांच्या दृष्टीने ही दोन्ही सत्ये खूप महत्त्वाची असतात.

**सर्व मुले समान असतात**

कोणत्या बाबतीत सर्व मुले सारखी असतात? बालकाचे जन्माला येणे आणि जन्मानंतर शारीरिकदृष्टया विकास पावणे, या दोन्ही बाबी नैसर्गिक आहेत . श्वासोच्छावास करणे, दूध पिणे, हातपायांची हालचाल करणे, रडणे या सर्वच नवजात मुलांच्या बाबतीत समान असणाऱ्या बाबी. पुढे, नजर स्थिर होणे, हात उंचावता येणे, पालथे पडणे, घोडा -घोडा करणे, रांगणे, बसणे, उभे राहणे, येणाऱ्या गोष्टी टप्पेही सगळया मुलांच्या बाबतीत चालता येणे, बोलता येणे अशा क्रमाक्रमाने सामान्यतः समानच असतात.

शारीरिक विकासाप्रमाणेच, बौध्दिक विकासही असाच सर्व मुलांच्या बाबतीत टप्प्याटप्प्याने होत जातो. पियाजे या स्वीस मानसशास्त्रज्ञाने मुलांच्या ज्ञानग्रहण प्रक्रियेच्या किंवा बौध्दिक विकासाच्या टप्प्यां चे

विवेचन केले आहे. ही टप्प्याटप्प्याने विकास घडून येण्याची प्रक्रियासुध्दा सर्व मुलांना लागू पडणारी आहे. प्रत्येक मूल एका टप्प्यातून दुसऱ्या टप्प्यात अनुक्रमाने जाते.

मूल दीड - दोन वर्षांच्या आसपास हुंकारांपासून बोलण्यापर्यंत प्रगती करते, आणि नंतर अतिशय वेगाने घरची भाषा आत्मसात करते. बालकांचे हे भाषाशिक्षणही असेच विशिष्ट पायांनी पुढे सरकत असते, आणि सर्वच मुले या सर्वच पायांवरून पुढे सरकत असतात.

अशा मूलभूत स्वरूपाच्या काही गोष्टींमध्ये सर्वच मुले सारखी असतात, याचे कारण असे, की या मानवी बालकाच्या बाबती त सर्व गोष्टी नैसर्गिक स्वरूपाच्या असतात, आणि त्यांचे नियोजन बालकाच्या मेंदूमध्ये नैसर्गिकरित्याच होत असते.

सर्वच मुले काही बाबतीत कशी सारखीच असतात, हे कळले, म्हणजे मग आपल्याला, प्रत्येक मुलाच्या बाबतीत वयाच्या कोणत्या टप्प्याला वाढीच्या बाबतीत कोणत्या गोष्टींची अपे समजते. एखादे मूल विशिष्ट टप्प्याला असलेली प्रगती, ते वय थोडेसे उलटून गेले तरी दाखवीत नसेल तर, त्याच्यामध्ये काही दोष निसर्गतःच आहे की काय, याचा लगेचच शोध घेता येतो. तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्लाही घेता येतो.

दुसरी महत्त्वाची बाब अशी की, बालकाच्या प्रगतीचे हे टप्पे समजावून घेतलेले पालक, ज्या वयात ज्या गोष्टी मुलांच्या नैसर्गिक क्षमतेच्या पलीकडे आहेत, अशा गोष्टींची अनाठायी अपेक्षाही करीत नाहीत; आणि मग अकालीच काही गोष्टी आपल्या मुलाला आल्या पाहिजेत, असा आग्रही धरीत नाहीत, किंवा त्या गोष्टी मुलाला शिकवविण्याचा वृथा प्रयत्नही करीत नाहीत. उदाह रणार्थ, अगदी अडीच तीन वर्षांच्या बालकाला आपल्या भावना - म्हणजे राग, लोभ वगैरे -आवरायची बौध्दिक ताकद आलेली नसते. त्या वेळी अशा गोष्टी चार चौघांत, लोकांसमोर मुलाकडून अभिव्यक्त होऊ नयेत यासाठी सक्ती करणे, मुलाला दामटणे या गोष्टी जागरूक पालक टाळत असतात; उलट वेगळयाच काही आकर्षक गोष्टींकडे लक्ष वेधून आपल्या भावना आवरायला नव्हे, तर विसरायला लावतात. आणखी एक उदाहरण घेता येईल. लहान मुलाची, वयाच्या चार - साडेचार वर्षांपर्यंत लेखन - वाचन शिकण्यासाठी आव श्यक ती मेंदूतील न्यूरॉन्सच्या बांधणीची तयारी झालेली नसते. त्यामुळे हाताच्या बोटांचे सूक्ष्म स्नायू तयार होणे, ते स्नायू, दृष्टी नि मय यांचा समन्वय साधणे, या गोष्टी घडायला अवकाश असतो. हे लक्षात घेऊन, अर्थातच आपले मूल खूप शिकावे या अपेक्षेने, या वयातच, म्हणजे खूप लवकर आणि खूप वेगाने, अक्षर ओळख करून देण्याचा किंवा त्याच्या बालशाळांतून तसा आग्रह धरण्याचा अट्टहास, मूल समजावून घेतलेले पालक, करीत नाहीत.

**प्रत्येक मूल वेगळे असते**

शारीरिक, भावनिक, बौध्दिक विकासाच्या मार्गावर, त्यातील विविध टप्प्यांमधून पयारीपायरीने सर्वच मुले जरी सरकत असली, तरीही या प्रवासात प्रत्येक बालकाचे वेगळेपणही दृष्टीस पडते. म्हणजे प्रत्येक बालक जसे दिसायला वेगळे असते, तसाच प्रत्येक मुलाचा प्रगतीचा वेगही वेगळा असतो. त्यामुळे विशिष्ट

टप्प्यांपर्यंत पोचणे आणि तो टप्पा पार करून पुढे जाणे, यांत मूल आपल्याला वेगाने सरकत असते. आपला सर्वसामान्य अनुभवही असाच आहे की, काही मुले बोलायला आधी लागतात तर त्या मानाने तोल सांभाळणे, उभे रहाणे, चालायला लागणे, पळायला लागणे अशा शारीरिक स्नायूच्या क्रिया ते मूल जरा उशिराने करते. तसेच काही मुले इतरांपेक्षा जरा उशिरा बोलायला लागतात. निसर्ग या गोष्टी ठरविण्याच्या बाबतीत जरी खूप बलवान असला; तरीही या बाबतीत पालकही खूप काही करू शकतात, असा बालमानसशास्त्रातील संशोधनाचा निर्वाळा आहे. उदाहरणार्थ विशिष्ट बाबतीत मूल मागे पडते आहे, असे जाणवले तर त्याबाबतीत प्रोत्साहन देण्याचे आणि प्रगतीची विशिष्ट साधने पुरविण्याचे काम पालक करू शकतात. 'अजून बोलत नाही' अशा मुलाला जरा अधिक वेळ देऊन त्याच्याशी बडबड करणे, मुलाला भाषा सारखी ऐकायला मिळेल असा प्रयत्न करणे, किंवा अजून सार्थ बडबड करायला न लागलेल्या मुलाच्या बडबडीलाही आपण शाब्दिक प्रतिसाद देत राहणे, अशा गोष्टी जागरूक असणारे पालक हमखास करू शकतात. मुलाच्या बोलण्याला त्याने मदत होते.

प्रत्येक मूल निसर्गतःच वेगळे असते, ते आणखीही एका बाबतीत. माणसाची बुध्दिमत्ता ही सर्वसामान्य अशी गोष्ट नसते, असे अलीकडच्या मेंदूविषयक संशोधनातून सिध्द झाले आह बुध्दिमत्ता अनेक असतात, अनेक प्रकारच्या असतात. आणि प्रत्येक बालकाला बुध्दिमत्तांचा एक विशिष्ट पट प्राप्त झालेला असतो. उदाहरणार्थ, एखाद्याला गणिती - तार्किक बुध्दिमत्ता उपजतच चांगली असेल, तर दुसऱ्याला भाषिक बुध्दिमत्ता अधिक तीव्रतेने प्राप्त झालेली असेल.किंवा एखादे मूल सांगीतिक बुध्दिमत्तेच्या बाबतीत तेज असेल. बालकाच्या मेंदूमध्ये अशा वेगवेगळया बुध्दिमत्तांची वेगवेगळी केंद्रे असतात.

ही शास्त्रीय माहिती आपल्यासमोर आल्यापासून पालकांना नि शिक्षकांना मुला - मुलीकडे पाहण्याची एक वेगळीच दृष्टी प्राप्त झाली आहे. प्रथमतःच लक्षात येते ते असे की, प्रत्येक मुलाच्या उपजत बुध्दिमत्तांचा शोध घेतला पाहिजे, घेता आला पाहिजे. दुसरे म्हणजे, बालकाच्या उपजत बुध्दिमत्तांनुसार त्याला विकासाच्या संधी प्राप्त करून दिल्या पाहिजेत; आणि त्यासाठी घरांतून नि शाळांतून कोणते उपक्रम, केव्हा, कसे राबवायचे हेही ठरवले पाहिजे. या दिशेने जाण्यासाठी पालकांना – शिक्षकांना काही कौशल्येही नव्याने आत्मसात करावी लागतील.

सर्वच मुले विकासाच्या विविध टप्प्यांमधून अनुक्रमाने जात असली, तरीही, विकासाचे कार्य प्रभावी होण्यासाठी, त्यांना विकासानुरूप अनुभवांचा पुरवठा करावा लागतो. एवढेच नव्हे तर वेगवेगळी मुले विकासाच्या वेगवेगळया टप्प्यांवर असताना, त्यांना द्यावयाचे अनुभवही वेगवेगळे असावे लागतात. प्रत्येक मुलाचे इतर मुलांशी असलेले विकासाच्या बाबतीतील साधर्म्य किंवा प्रत्येक मुलाचे व्यक्तिविशिष्ट असे वेगळेपण समजावून घेणे, हा शास्त्रीय बालशिक्षणाचा पा या आहे.

❖